**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : तेजस सुदाम मेंगडे,
वय : २३ वर्षे, व्यवसाय : शेती,
राहणार : मेंगडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. मी फिर्यादीला ओळखतो. ते आमच्या शेजारी राहतात. मी आरोपींना ओळखतो ते आमच्या गावातील आहे. घटना साधारण दोन वर्षापुर्वी घडली होती. आमच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची झाली होती. आरोपींनी मला, फिर्यादीला व इतर साक्षीदारांना मारहाण केली होती अशी कोणतीही घटना घडली नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०/०५/२०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मित्र मंगेश मेंगडे हा ई सेवा केंद्र येथे असतांना आम्हाला भांडणाचा आवाज आला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जवळ जाऊन पाहिले असता तेथे तेजस उर्फ बबलु मेंगडे व त्याचा मित्र ओंकार मेंगडे असे दोघे हातात काठ्या घेऊन अमोल मेंगडे यास शिवीगाळ करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोघांनी त्यांच्या हातातील काठ्यांनी अमोल मेंगडे यांस पाठीवर व खांद्यावर मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा मित्र मंगेश असे आम्ही दोघांनी भांडणे सोडवली. हे म्हणणे खरे नाही की, संध्याकाळी ७.१५ वाजताच्या सुमारास अमोल व त्याचा भाऊ तुषार हा त्यांच्या घराच्या अंगणात बसले असता ओंकर मेंगडे व तेजस उर्फ बबलु मेंगडे असे दोघे अमोल याच्यासोबत झालेल्या भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ करत आले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्यांच्या हातात अर्धवट फुटलेली बिअरची बाटली होती. हे म्हणणे खरे नाही की, ओंकारने अमोलच्या गचुंडीने धरुन डाव्या हातातील बिअरची अर्धवट फोडलेली बाटली त्याच्या डोक्यात व उजव्या हाताच्या दंडावर मारुन दुखापत केली.

३. हे म्हणणे खरे नाही की, सदर भांडणे सोडविण्याकरीता तुषार गेला असता बबलु मेंगडे याने त्याच्या हातातील बिअरची अर्धवट फोडलेली बाटली तुषारच्या डोक्यात मारुन दुखापत केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर भांडण्याचा आवाज ऐकुन मी सोडविण्यासाठी गेलो असता बबलु उर्फ तेजस मेंगडे याने त्याच्या हातातील बिअरची अर्धवट फोडलेली बाटली माझ्या उजव्या हाताच्या पंजावर मारुन दुखापत केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोघांनी सदर बिअरच्या बाटल्या अंगणात टाकुन, शिवीगाळ करुन निघुन गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी जाताना " तुम्ही जर पोलीसात तक्रार दिली तर कोयत्याने कापुन टाकू " अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला, अमोल मेंगडे व तुषार सुदाम मेंगडे याला मारहाण करुन दुखापत केल्याने अमोलने पारगाव पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदविला. हे म्हणणे खरे नाही की, सदर जबाब मी वाचुन पाहीला, त्यातील मजकुर मला खरा व बरोबर वाटला म्हणुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींमध्ये आणि माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे आणि त्यानुसार संयुक्तिक तडजोड पुरशिस **निशाणी क्र.१५** वर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्यामध्ये तडजोड झाली आहे म्हणुन आरोपीला शिक्षा होवु नये यासाठी मी आजरोजी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे वकील श्री. एन. आर. निघोट</u>**

५. **नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. ११/०२/२०२६**
**घोडेगाव**